<u>ॲग्रिस्टॅकच्या वापरादरम्यान उद्भवणाऱ्या अपवादात्मक प्रकरणांबाबत करावयाच्या कार्यवाहीच्या अनुषंगाने मार्गदर्शक कार्यपद्धती (SOP) निश्चित करणेबाबत</u>.....

महाराष्ट्र शासन
महसूल विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण-२०२२/प्र.क्र.३१३/ई-१५५८९८९/भूमापन
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ६ नोव्हेंबर, २०२६.

संदर्भ :- १. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.१५७/१०-अे, दि.१४.१०.२०२४
२. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२२/प्र.क्र.३१३/भूमापन, दि.१८.९.२०२६

प्रस्तावना:-

शासन निर्णय, दि.१८.९.२०२६ अन्वये अपवादात्मक प्रकरणे योग्यरित्या हाताळण्यासाठी मार्गदर्शक कार्यपद्धती (SOP) तयार करण्याकरिता जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमि अभिलेख, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. AgriStack अंतर्गत काही अपवादात्मक प्रकरणांमध्ये शेतकरी ओळख क्रमांक (Farmer ID) प्रदान करण्यासाठी आवश्यक असलेली जमीनधारणा अथवा प्रत्यक्ष लागवडीखालील क्षेत्राची माहिती उपलब्ध नसल्यामुळे किंवा प्रचलित महसुली अभिलेखांच्या आधारे सदर क्षेत्र निश्चित करणे शक्य नसल्यामुळे संबंधित शेतकऱ्यांना Farmer ID साठी नोंदणी करताना अडचणी उद्भवतात. अशा प्रकरणांमध्ये संबंधित व्यक्तीची पात्रता व क्षेत्राची माहिती निश्चित करण्यासाठी एकसमान, पारदर्शक व अधिकृत अभिलेखांवर आधारित कार्यपद्धती निर्धारित करणे आवश्यक आहे. याबाबी विचारात घेऊन सदर समितीने अपवादात्मक प्रकरणांतील पात्र शेतकरी / जमीनधारक / प्रत्यक्ष शेती करणाऱ्या व्यक्तींना शेतकरी ओळख क्रमांक (Farmer ID) प्रदान करण्यासाठी क्षेत्रीय स्तरावर क्षेत्राची पडताळणी व नवीन प्रणालीमध्ये माहिती प्रविष्ट करण्याबाबतची मानक कार्यपद्धती (SOP) बाबतचा अहवाल शासनास सादर केला आहे.

त्यानुषंगाने ॲग्रिस्टॅकच्या वापरा दरम्यान उद्भवणाऱ्या अपवादात्मक प्रकरणांबाबत करावयाच्या कार्यवाहीच्या अनुषंगाने मार्गदर्शक कार्यपद्धती (SOP) निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन परिपत्रक :-

सदर मार्गदर्शक कार्यपद्धती (SOP) महसूल विभाग, शासन निर्णय, दि.१८.९.२०२६ मध्ये नमूद केलेल्या तसेच शासन / सक्षम प्राधिकाऱ्याने वेळोवेळी मान्य केलेल्या अपवादात्मक प्रकारच्या प्रकरणांसाठी लागू राहील. उदाहरणार्थ:

अ) दिनांक १ जानेवारी, २०१५ पुर्वी जे शेतकरी शेती कसत होते व आजही ती शेती त्या शेतक-याच्या ताब्यात असून ती शेती सदर शेतकरी कसत आहे आणि त्याबाबतचा एक तरी पुरावा त्या शेतक-याकडे आहे असे शेतकरी.

ब) अधिकृत भाडेपट्टा किंवा करार शेती करणाऱ्या व्यक्ती. शासनाकडून जमीन मंजूर / वाटप झालेल्या पात्र व्यक्ती.

क) शासन निर्णयात नमूद केलेली अन्य समतुल्य अपवादात्मक प्रकरणे.

२. उपरोक्त नमूद अपवादात्मक प्रकारच्या प्रकरणांकरिता शेतकरी ओळख क्रमांक (Farmer ID) प्रदान करण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यपद्धती निश्चित करण्यात येत आहे :-

(१) ग्राम महसूल अधिकारी यांच्याकडून अभिलेख तपासणी व क्षेत्र निश्चिती:-

ग्राम महसूल अधिकारी यांनी प्रणालीमध्ये माहिती नोंदविण्यापूर्वी संबंधित गावातील उपलब्ध जुने व अद्ययावत महसुली अभिलेख, जमीन महसूल भरल्याबाबतच्या पावत्या, इनाम नोंदवही (Alienation Register), सनद, भाडेपट्टा किंवा करारपत्र, जमीन मंजुरी आदेश तसेच क्षेत्र निश्चितीच्या अनुषंगाने आवश्यक असलेल्या अन्य संबंधित अधिकृत अभिलेखांची सखोल तपासणी करावी व सदर तपासणीसाठी आधारभूत असलेल्या संबंधित अभिलेखांच्या प्रती प्रणालीमध्ये अपलोड कराव्यात. तसेच सदर शेतकरी यांची यादी ग्राम महसूल अधिकारी यांनी चावडीवर प्रसिद्धी करावी.

(२) मंडळ अधिकारी यांच्याकडून पडताळणी:-

मंडळ अधिकारी यांनी ग्राम महसूल अधिकारी यांनी प्रणालीमध्ये नोंदविलेली माहिती, क्षेत्र निश्चितीकरिता विचारात घेतलेला आधार तसेच प्रणालीमध्ये संलग्न केलेले संबंधित अधिकृत अभिलेख व पुरावे यांची जबाबदारीपूर्वक पडताळणी करावी. पडताळणीअंती सदर माहिती योग्य व संबंधित अभिलेखांशी सुसंगत असल्याचे आढळल्यास, प्रकरण प्रणालीद्वारे तहसिलदार यांच्याकडे मान्यतेसाठी सादर करावे. तथापि, सदर माहिती चुकीची, अपूर्ण किंवा संबंधित अभिलेखांशी विसंगत असल्याचे आढळल्यास, आवश्यक त्या सुधारणा व पूर्ततेसाठी प्रकरण प्रणालीद्वारे ग्राम महसूल अधिकारी यांच्याकडे परत पाठवावे.

(३) तहसिलदार यांच्याकडून अंतिम मान्यता :-

तहसिलदार यांनी ग्राम महसूल अधिकारी यांनी प्रणालीमध्ये नोंदविलेली माहिती, मंडळ अधिकारी यांनी केलेली पडताळणी तसेच प्रणालीमध्ये अपलोड केलेले संबंधित दस्तऐवज व पुरावे यांची जबाबदारीपूर्वक छाननी करावी. सदर छाननीअंती उपलब्ध अभिलेख व पुराव्यांच्या आधारे प्रकरणाची सत्यता व वैधता पडताळून प्रणालीद्वारे संबंधित प्रकरणास मंजुरी प्रदान

करावी अथवा नामंजूर करावे. नामंजुरीच्या प्रकरणात त्याची कारणे प्रणालीमध्ये स्पष्टपणे नमूद करावीत.

(४) प्रणालीमध्ये प्रविष्ट केलेली माहिती केंद्रीय प्रकल्प व्यवस्थापन यंत्रणा (CPMU) यांना उपलब्ध करून देणे:-

तहसीलदार यांच्याकडून मान्यता प्राप्त झाल्यानंतर, प्रणालीमध्ये नोंदविलेल्या प्रत्येक शेतकऱ्याच्या संबंधित शेतहिश्श्यास स्वतंत्र Farm ID प्रदान करून सदर माहिती पुढील कार्यवाहीसाठी केंद्रीय प्रकल्प व्यवस्थापन यंत्रणा (CPMU) यांना उपलब्ध करून देण्यात यावी. या माहितीच्या आधारे संबंधित शेतकरी नागरी सुविधा केंद्रामार्फत (CSC) इतर शेतकऱ्यांप्रमाणे विहित कार्यपद्धतीनुसार शेतकरी ओळख क्रमांकासाठी (Farmer ID) नोंदणी करू शकतील.

३. उपरोक्त नमूद कार्यपद्धतीनुसार ग्राम महसूल अधिकारी यांच्यामार्फत संबंधित माहितीची नोंद व आवश्यक कागदपत्रे अपलोड करण्यासाठी स्वतंत्र प्रणाली / मॉड्यूल विकसित करण्याबाबतची आणि सदर स्वतंत्र प्रणाली / मॉड्यूलची आवश्यक तांत्रिक कार्यवाही पूर्ण करून ते संबंधित क्षेत्रीय महसूल यंत्रणेस वापरासाठी उपलब्ध करून देण्याबाबतची कार्यवाही जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमि अभिलेख, पुणे यांनी करावी.

४. सदर मानक कार्यपद्धतीची अंमलबजावणी संबंधित सर्व क्षेत्रीय महसूल अधिकारी व यंत्रणांनी विहित कार्यपद्धतीनुसार करावी.

५. या प्रक्रियेदरम्यान नोंदविण्यात येणारी माहिती व क्षेत्र निश्चिती ही केवळ शेतकरी ओळख क्रमांक (Farmer ID) प्रदान करण्याच्या प्रयोजनासाठी ग्राह्य राहील. सदर कार्यपद्धतीमुळे प्रचलित महसुली अभिलेखांतील नोंदी, मालकी हक्क अथवा अन्य वैधानिक हक्कांमध्ये कोणताही बदल होणार नाही. या कार्यपद्धतीच्या अंमलबजावणी दरम्यान काही अडचणी किंवा संदिग्धता उद्भवल्यास, त्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्यांचे मार्गदर्शन घेऊन पुढील कार्यवाही करण्यात यावी.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येत असून त्याचा संकेतांक २०२६११०६१७३६०८९१४८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANJAY RAGHUNATH BANKAR

Digitally signed by SANJAY RAGHUNATH BANKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=C8A7D6860FF227FD9E69A02E9CA5DFB2CCB25EDA92D749629970F349FC6ED260, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C5917E56B0DA516AB259D846D516CB0584DCE5E9A2E73C0A35FA47BAB64E88AA, cn=SANJAY RAGHUNATH BANKAR
Date: 2026.11.12 15:12:57 +05'30'

(संजय बनकर)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव.

२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव.

३. मा. उप मुख्यमंत्री [नगरविकास, गृह निर्माण, सार्वजनिक बांधकाम (सा.उ.)] यांचे सचिव.
४. मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, अल्पसंख्यांक विकास व औकाफ) यांचे सचिव.
५. मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव
६. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
७. सर्व मा.विधान सभा सदस्य व विधान परिषद सदस्य
८. मा.मुख्य सचिवांचे स्वीय सहायक
९. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई
१०.सचिव, कृषि विभाग, मंत्रालय, मुंबई
११.सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
१२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१ मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर.
१३.महालेखापाल (लेखा परिक्षा) महाराष्ट्र-१ मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर.
१४. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१५.आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे
१६.विभागीय आयुक्त (सर्व).
१७.जिल्हाधिकारी (सर्व).
१८.भूमापन कार्यासन संग्रहार्थ